पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर व नवी मुंबई येथील पदावर नियुक्ती बाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः ईएसटी-३९१९/प्र. क्र. ९४/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ मे, २०१९

वाचा: १) महाप्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्रA-१२२३/८१/९४३/२०१९, दिनांक २२.०४.२०१९ चे पत्र.
२) महाप्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र A-१२२३/८१/१०१६/२०१९ दिनांक ०३.०५.२०१९ चे पत्र.

शासन आदेश -

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम, अधिनियम १९७७ (१९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३) च्या कलम ८ अन्वये खालील तक्त्यात नमूद न्यायीक अधिकाऱ्याची त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक- ३ मध्ये दर्शविलेल्या पदावर पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे निदेशास अनुसरुन सदर नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव व सध्या धारण करीत असलेले पद	नियुक्ती झालेले ठिकाण व पद
१	२	३
१	श्री. अवधूत गजानन देशींगकर, सह दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ विभागीय आणि अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी, भूम, जिल्हा उस्मानाबाद.	पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर.
२	श्री. गोविंद लालचंद मसंद, न्यायाधिश, लघुवाद न्यायालय, मुंबई	पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, नवी मुंबई

२. पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर या पदावर कार्यरत श्रीमती वंदना व्ही. जोशी यांच्या बदली आदेशानुसार त्यांना सदर पदावरून कार्यमूक्त केल्यानंतर श्री. अवधूत गजानन देशींगकर यांनी पिठासीन अधिकारी, कोल्हापूर पदावर रुजू व्हावे व पदभार स्विकारल्याचा दिनांक शासनास सादर करावा. श्री. देशींगकर यांची बदली त्यांच्या विनंतीनुसार करण्यात येत असल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचे दैनिक/प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

३. श्री. गोविंद लालचंद मसंद यांनी पिठासीन अधिकारी, नवी मुंबई पदावर दिनांक ०३.०६.२०१९ पूर्वी रुजू व्हावे व पदभार स्विकारल्याचा दिनांक शासनास सादर करावा.

४. याबाबतची आवश्यक ती अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र (भाग-१) मध्ये प्रसिध्द करण्याची कार्यवाही आयुक्त (शिक्षण) यांनी करावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५१७१७०४४१६८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2019.05.20 18:16:53 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, शिक्षण आयुक्तालय (मध्यवर्ती इमारत), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर/मुंबई
३) महाप्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई
४) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
५) संबंधित शिक्षणाधिकारी, (प्राथ./माध्य./निरंतर)
६) जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर / मुंबई
७) पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर / मुंबई
८) महिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
९) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई (पत्राद्वारे)

प्रत, (माहितीस्तव)

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२) अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक
४) निवडनस्ती.